वाचले :- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम -१९८२ मधील नियम १०(१).
२) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४६/१५ दिनांक २०/१०/२०१५
३) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय थेरगाव यांचे दि.२३/११/२०१६ रोजीचे पत्र
४) मा.लेखाधिकारी यांचेकडील दि.२७/१०/२०१६ रोजीचे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र.
५) मा.शिक्षणाधिकारी यांचेकडील दि.१६/१२/२०१६ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ १०८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/१/कावि/१७५९/१६
दिनांक :- १६/१२/२०१६

विषय :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
श्रीमती.पवार कालींदी शांताराम पदनाम- उपशिक्षिका
(संगणक क्र.५९०१)

आदेश,

श्रीमती.पवार कालींदी शांताराम ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपशिक्षिका या गट क मधील पदावर माध्यमिक विद्यालय थेरगाव येथे कामकाज करीत आहेत. दिनांक ०१/०९/१९८१ रोजी त्या म.न.पा.मध्ये उपशिक्षिका पदावर रूजू झाल्या आहेत. त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदीनुसार त्यांची जन्मतारीख २६/०१/१९५९ अशी असून,दिनांक २५/०१/२०१७ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पूर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम -१९८२ मधील नियम १०(१).नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्षे पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय थेरगाव यांनी दिनांक २३/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये श्रीमती.पवार कालींदी शांताराम, उपशिक्षिका यांचेकडून म.न.पा.चे घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज,संगणक कर्ज येणे बाकी नसले बाबत दाखले सादर केले आहेत. त्यानुसार त्यांचेकडे कोणत्याही प्रकारचे कर्ज बाकी नसलेचे निदर्शनास येत आहे.तसेच त्यांचे नांवे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीचे कर्ज बाकी नाही. श्रीमती.पवार कालींदी शांताराम उपशिक्षिका यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही. तसेच त्यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नाही असा अहवाल मुख्याध्यापक यांनी सादर केला असून त्यांना दिनांक ३१/०१/२०१७ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

श्रीमती.पवार कालींदी शांताराम, उपशिक्षिका यांना सेवासातत्य दिलेले नाही तरीही भविष्यात लेखा परिक्षणाची वसुली निघाल्यास त्याची संपूर्ण रक्कम संबंधिताचे निवृत्ती वेतनामधून वसूल करणेस अधिन राहून रूजू दिनांक ०१/०९/१९८१ या प्रमाणे नोंद घेणेत यावी.

सबब, मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय थेरगाव यांचेकडील दिनांक २३/११/२०१६ रोजीचा अहवाल,महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियमातील उक्त तरतूद विचारात घेवून मी,शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ उपरोक्त वाचले क्र.२ चे आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार श्रीमती.पवार कालींदी शांताराम, उपशिक्षिका यांना दि.३१/०१/२०१७ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीमती.पवार कालींदी शांताराम, उपशिक्षिका यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Kamble
१६/१२/१६
प्र.शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रती,

श्रीमती.पवार कालींदी शांताराम, उपशिक्षिका

प्रत :- १) लेखा विभाग
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंद कक्ष,संगणक कक्ष (प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,~~मागास~~वर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्र. २ व ४, ४) माध्यमिक विद्यालय थेरगाव २/- पुढील कार्यवाहीसाठी



Scanned with CamScanner